बाब क्रमांक ११ / मुंबई (मध्य/पश्चिम/पूर्व), ठाणे व पनवेल .

विषय :- काळी पिवळी रिक्षा-टॅक्सी संवर्गातील मोटार वाहनाचे नोंदणी रद्द करणे/ वाहन मोडीत / भंगार (Scrap) मध्ये काढण्यासाठी तरतूद

काळी पिवळी रिक्षा-टॅक्सी यांची राज्य परिवहन प्राधिकरणाने दि.२९.४.२०१३ रोजी ठराव क्र.०७/२०१३ नूसार रिक्षासाठी १६ वर्षे आणि टॅक्सी साठी २० वर्षे वयोमर्यादा निश्चित केलेली आहे तथापि काही प्रमाणात नोंदणी रदद झालेल्या रिक्षा/टॅक्सी रस्त्यावर धावत असल्याच्या तक्रारी येत असून अशा प्रकारची काही प्रकरणे आढळून आलेली आहे. अशा ऑटोरिक्षा/टॅक्सी रस्त्यावर धावत असल्यामुळे जीवीतहानी होण्याची मोठया प्रमाणात शक्यता आहे. तसेच अधिकृत रिक्षा/टॅक्सी परवाना असलेल्या परवाना धारकांच्या व्यवसायावर त्याचा विपरित परिणाम होतो.याशिवाय या वाहनांचे मशिनचे सुटे भाग दुसया रिक्षा/टॅक्सी करिता वापरण्यात येतात. त्यामुळे धोका निर्माण होउ शकतो त्याचप्रमाणे सिलेंडरमधिल गॅस यांचेमुळे आग लागून वित्तहानी आणि प्राणहानी होण्याची शक्यता असते.परिणामी अशा रिक्षा/टॅक्सी मोडित किंवा भंगारमध्ये काढतांना दाबयंत्राच्या (Hydraulic Press) सहाय्याने पूर्णपणे नष्ट करणे जरूरीचे आहे.

सद्य:स्थितीत मुंबईतील तिन्ही कार्यालयात मिळून दररोज सुमारे ४० ते ५० रिक्षा व टॅक्सी वाहनांची नोंदणी रद्द करण्यासाठी अर्ज प्राप्त होतात इतक्या संख्येला पुरेशी अशी व्यवस्था असणे आवश्यक आहे.

वाहन नोंदणी रद्द करण्याच्या / मोडीत काढण्याच्या कामकाजासाठी कार्यशाळा / फर्म / गॅरेजच्या नियूक्ती करण्यासाठी अर्ज/निविदा मागविण्यात याव्यात व अर्जा निविदेमध्ये खालील अटींची पूर्तता करणाऱ्या अर्जदारास अधिकृत करण्यात यावे. असे प्रस्तावित आहे.

१) <u>प्रस्तावीत प्रक्रिया (Scrapping Process)</u>

वाहन पूर्णपणे भंगारात (Scrap) काढतांना साधारणता खालील प्रक्रीया आवश्यक आहे.

अ) वाहनांचे प्रमुख भाग इंजिन चॅसीस (बॉडी), प्लॅस्टीकचे भाग व गॅस सिलेंडर ई. वेगवेगळे करावे.

ब) इंजिन वेगळे करुन त्यातील तेल (Oil) वेगळे करावे.

क) सिलेंडर वेगळे करावे त्यातील वायू (Gas) Controller of Explosive [CoE] यांनी निर्देशिलेल्या मार्गदर्शक सूचनेनुसार काढून टाकावा व नंतर त्याची विल्हेवाट करावी.

ड) 'प्लॅस्टीकच्या भागाची योग्य रितीने विल्हेवाट लावावी.

इ) उर्वरीत चासीस (बॉडी) दाबयंत्राच्या (Hydraulic Press) सहाय्याने दाबून एकत्रित करावे व तद्नंतर शिअरींग मशीनने (Shearing Machine) तुकडे करावे. सदर भंगारावर योग्य प्रक्रिया करण्यात यावी.

२) साधन-सामग्री व इतर आवश्यक बाबी (Machines and Equipments)

वरील प्रमाणे प्रक्रिया करण्यासाठी खालीलप्रमाणे यंत्रे, साधन सामुग्री, जागा आणि प्रशिक्षित मनुष्यबळ असणे आवश्यक आहे.

१) जागा - उपरोक्त नमूद सुटे भाग साठा करणे ई. साठी सुमारे २०,००० चौ.फू. जागा व पुरेशी इमारतअसणे आवश्यक आहे.

२) सुमारे १५० टन क्षमतेचे Hydraulic Bailing Press मशीन.

३) तुकडे करणारी यंत्र (Shearing machine)

४) वाहनाचे सूटे भाग करण्यासाठी व इंजिनातील तेल काढण्यासाठी स्वंतत्र कक्ष (Bay)

५) सिलेंडर मधील असलेला गॅस काढून घेण्यासाठी (Degassing) CoE यांनी निर्धारित केलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार असलेली यंत्रणा व सुविधा यासाठी CoE ची परवानगी असणे आवश्यक आहे.

६) अर्जदाराने मोडीत काढलेल्या वाहनांचे तसेच नष्ट केलेल्या गॅस सिलेंडरबाबतचे अभिलेख तयार करुन ते संबंधित 'नोंदणी प्राधिकरण' आणि CoE यांना वेळोवेळी सादर करणे आवश्यक आहे.

७) अर्जदाराकडे - फोर्क लिफ्ट, बेल्ट कन्व्हेअर, गॅस कटींग सयंत्रे, वाहनांचे सुटे भाग हातळण्यासाठी आवश्यक यंत्रणा असणे आवश्यक आहे. तसेच क्लोज सर्कीट टीव्ही / कॅमेराची ही सोय असावी

८) योग्य तांत्रिक अनुभव असलेले /औदयोगिक प्रशिक्षण संस्थचे (ITI) प्रशिक्षीत कर्मचारी वर्ग असणे आवश्यक आहे.

९) अर्जदाराने CoE महानगरपालिका ईत्यादी संबंधित विभागाकडून रीतसर परवानगी घेणे आवश्यक आहे.

१०) मोडीत काढलेली वाहने जर पुर्नःवापरात आल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी अधिकृत केद्रांची (अर्जदाराची) असेल असे शपथपत्र अधिकृत केद्रांकडून घेण्यात यावे तसेच शपथपत्रासोबत निश्चित केलल्या रक्कमेचे बॅकेचे हमी पत्र (Bank gaurantee) घेण्यात यावे.

११) मुंबई महानगर क्षेत्र परिवहन प्राधिकरण (एमएमआरटीए) राज्य परिवहन प्राधिकरण (एसटीए) यांनी निश्चित केल्याप्रमाणे अथवा त्याच्या मार्गदर्शानुसार अधिकृत केद्राने प्रती रिक्षा/ टॅक्सी यांचेवर मोडीत काढण्यासाठी शुल्क / दर आकारावेत.

१२) रिक्षा/टॅक्सी संवर्गातील वाहने स्क्रॅप करणे संबंधीत वाहन उत्पादकाकडून मार्गदर्शक सूची मागवावी.

३) कायदयातील तरतुदी

मोटार वाहनाची नोंदणी रद्द केल्यानंतर वाहन मोडीत काढण्याची / भंगार करण्याची तरतूद मोटार वाहन कायद्यात नाही. मात्र सार्वत्रिक सेवा वाहनांच्या बाबत फक्त रिक्षा / टॅक्सी मोडीत / भंगारात काढणेकरिता हॅड्रॉलीक प्रेस मशिनचा उपयोग करावा असा ठराव मुंबई महानगर क्षेत्र परिवहन प्राधिकरणाने दि.११.५.०१५ रोजी ठराव केलेला आहे. (ठराव क्र. २८/२०१५) तसेच राज्य परिवहन प्राधिकरणाचा दि.१९.४.२०१३ च्या बैठकीतील निर्णयास अनुसरुन अशी तरतूद नियमात झाल्यास अमंलबजावणी प्रभाविपणे करता येईल.

सदर बाब प्राधिकरणाच्या विचारार्थ सादर करण्यात आली होती. सविस्तर चर्चा करुन प्राधिकरणाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला.

निर्णय :-

अ) सदर प्रस्तावास प्राधिकरणाने तत्वतः मान्यता दिली.

ब) परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांच्या अभिप्रायासह सविस्तर प्रस्ताव पुढील बैठकीत सादर करावा, असे निर्देश प्राधिकरणाने दिले.

(निर्णय क्रमांक ५०/२०१५)

बाब क्रमांक १२ / मुंबई (पूर्व)

विषय- शेअर ए रिक्षा मार्गास मंजूरी मिळणेबाबत (एकूण ४)

महाराष्ट्र शासन परिवहन विभागाचे धोरणानुसार व प्रवांशाच्या सोयीसाठी सदर शेअर-ए-रिक्षा मार्गाचा प्रस्ताव

या कार्यालयाचे मोटार वाहन निरिक्षक श्री विक्रम पाटील यांनी अर्जात नमुद केलेल्या मार्गाचे दि १४/७/१५ रोजी ई-मिटर असलेलया रिक्षाने कि.मी. व येणारे भाडे अधिक ३३ टक्के व प्रती प्रवाशी भाडे निश्चित केलेला सविस्तर अहवाल सादर केला आहे.

विक्रोळी वाहतूक विभाग पोलीस वाहतूक शाखा यांचे दि ०३/८/१५ रोजी याबाबत हरकत /ना-हरकत मागविण्यात आले. त्यानुसार जा.क्र १३९३ विक्रोळी वाहतूक विभग यांचे दि.४/०९/१५ रोजी याबाबत ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त झाले आहे.

खालील नमूद केलेले शेअर-ए-रिक्षा मार्गास मान्यता मिळणेकरिता प्रस्ताव प्राधिकरणापूढे सविनय सादर.

अ.क्र.		कि.मी.	वेटिंग चार्जसह मीटरमध्ये दर्शविण्यात आलेले भाडे	३३% ज्यादा	एकूण भाडे	प्रती प्रवाशी	पूर्णांकास भाडे रु.
१	भांडूप स्टेशन (पूर्व) ते भवानीनगर	१.६	२१	०६.९३	२७.९३	०९.३१	९
२	भवानीनगर ते भांडूप स्टेशन (पूर्व)	१.६	२१	०६.९३	२७.९३	०९.३१	९
३	विक्रोळी स्टेशन (पूर्व) ते आर मॉल	०.८	१८	०५.९४	२३.९४	०७.९७	८
४	आर मॉल ते विक्रोळी स्टेशन (पूर्व)	०.८	१८	०५.९४	२३.९४	७.९८	८

बाब क्रमांक :- १० व ११

विषय :- मोटार वाहन अधिनियम, १९८८ च्या कलम ७५ व रेंट-ए-मोटार सायकल स्कीम १९९७ अंतर्गत मोटार सायकल भाड्याने देण्यासाठी मुख्य/शाखा कार्यालयाच्या लायसन्स मिळावे म्हणून
१) मे. विकेडराईड ॲंडव्हेंचर सर्व्हिसेस लिमीटेड यांचे दिनांक २५.०२.२०१५ रोजीचा विनंती अर्ज.
२) मे. श्रीगुरु ऑटो, प्रो. श्री. राहुल प्रकाश मोकाशी यांचा दिनांक ०६.०५.२०१५ रोजीचा विनंती अर्ज.

राज्य परिवहन प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य ह्यांनी विषयसूचीचे अवलोकन केले.

तसेच, पोलीस उपआयुक्त (वाहतुक) शाखा पुणे शहर यांचे दिनांक २६.०८.२०१५ रोजीच्या अहवालाची नोंद घेतली. सखोल चर्चेअंती रेंट-ए-मोटार सायकल स्कीम १९९७ योजनेअंतर्गत कार्यरत होणाऱ्या वाहनांमुळे कायदा व सुव्यवस्थेचा बाब तपासण्याचा निर्णय घेण्यात आला.

उपरोक्त विषयी प्राधिकरणाचे सदस्य तथा अपर पोलीस महासंचालक (वाहतूक) महाराष्ट्र राज्य, मुंबई. यांनी या विषयी तपासणी करुन अहवाल सादर करण्याचा निर्णय प्राधिकरणाने घेतला. तसेच, सदर अहवाल प्राप्त झाल्यानंतर सदर बाब राज्य परिवहन प्राधिकरणासमोर पुढील बैठकीत सादर करण्याविषयी प्राधिकरणाचे सचिव यांना निर्देशित केले.

(रा.प.प्रा.म.रा.मुंबई, बैठक दिनांक २६.१०.२०१५ ठराव क्र. २५/२०१५)

अतिरिक्त बाब क्रमांक :- ०१

विषय :- अनधिकृत ऑटोरिक्षा मोडीत काढण्याकरीता प्रादेशिक परिवहन कार्यालयात आलेली वाहने हॅड्रॉलिक किंवा जेसीबी मशीन ने दाबून टाकण्याबाबत.

राज्य परिवहन प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य ह्यांनी विषयसूचीचे अवलोकन केले.

अनधिकृत ऑटोरिक्षा रस्त्यावर धावत असल्यामुळे व जुन्या ऑटोरिक्षा वाहनांचे सुट्टे भाग दुसऱ्या ऑटोरिक्षाकरिता वापरण्यात येत असल्यामुळे प्रवाशांना धोका व प्राणहानी होण्याची शक्यता निर्माण होत असल्याने राज्य परिवहन प्राधिकरणाने राज्यातील सर्व अनधिकृतरित्या चालणाऱ्या ऑटोरिक्षा कायमस्वरुपी नष्ट करण्याचा निर्णय घेतला.

मुंबई महानगर क्षेत्र परिवहन प्राधिकरण यांनी त्यांच्या दिनांक ११.०५.२०१५ रोजीच्या बैठकीतील ठराव क्रमांक २८/२०१५ अन्वये ऑटोरिक्षा कायमस्वरुपी नष्ट करण्याकरिता हायड्रोलिक प्रेस इत्यादीसारख्या संयंत्रांचा वापर करण्यासाठी मान्यता दिली आहे. राज्यातील सर्व प्रादेशिक परिवहन प्राधिकरणांच्या धोरणामध्ये एकसूत्रता रहावी म्हणून मोटार वाहन अधिनियम, १९८८ चे कलम ६८ (३) (अ) व ६८ (४) च्या तरतुदीनुसार राज्यातील सर्व प्रादेशिक परिवहन प्राधिकरणांना राज्यात अनधिकृतरित्या चालणाऱ्या ऑटोरिक्षा कायमस्वरुपी नष्ट करण्यासंदर्भात मुंबई महानगर क्षेत्र परिवहन प्राधिकरण ह्यांनी घेतलेल्या उपरोक्त निर्णयाप्रमाणे कार्यवाही करण्याचे निर्देश देण्याचा प्राधिकरणाने निर्णय घेतला.

(रा.प.प्रा.म.रा.मुंबई, बैठक दिनांक २६.१०.२०१५ ठराव क्र. २६/२०१५)

(२) परवान्यावर दाखल करावयाचे बदली वाहन आधीच्या वाहनापेक्षा कमी वयाचे (हायर मॉडेल) असावे हा निर्णय बदलून नवीन निर्णयानुसार मुंबई शहरातील ऑटोरिक्षा वाहन परवान्यावर चढवायचे बदली वाहन (Replacement Vehicle) हे फक्त नवीन (Brand New) असावे.

सदर निवेदनाव्दारे अशी विनंती करण्यात येत आहे की, किमान ५ वर्षे वयाच्या ऑटोरिक्षा एका परवान्यावरून दुस-या परवान्यावर हस्तांतरीत करण्यास परवानगी द्यावी. आजही आणि अद्यापपर्यंत मुंबई महानगर क्षेत्र परिवहन प्राधिकरणाच्या बाहेर अन्य आर.टी.ए. क्षेत्रामध्ये एका परवान्यावरुन दुस-या परवान्यावर वाहन हस्तांतरीत करण्यात येत आहे हयाची नोंद घ्यावी.

सदर विषयाबाबत बैठकीत चर्चा करण्यात आली.

निर्णय:

सादर केल्याप्रमाणे ५ वर्ष वयाच्या ऑटोरिक्षा व टॅक्सी एका परवान्यावरुन दुसऱ्या परवान्यावर वाहनाची नोंद घेण्यास प्राधिकरणाने मान्यता दिली. तथापि बदली वाहन ज्या परवान्यावर नोंदविण्यात येणार आहे. त्याचा तपशील देणे आवश्यक राहील, असे निर्देश प्राधिकरणाने दिले.

(निर्णय क्रमांक २७/२०१५)

झ) **अनधिकृत ऑटोरिक्षाला सीएनजी आऊटलेट केंद्रावरुन सीएनजी इंधन मिळू नये हयाकरीता आर.एफ.आय.डी. योजना सुरु करणेबाबत तसेच मोडीत काढण्याकरीता प्रा.प. कार्यालयात आलेली वाहने हॅड्रॉलिक किंवा जेसीबी मशीन ने दाबून टाकावीत.**

अधिकृत ऑटोरिक्षांसह स्क्रॅप झालेल्या, रद्द झालेल्या मुंबई शहराबाहेर जाण्याकरीता एन.ओ.सी. घेतलेल्या परंतु मुंबई शहरातच प्रवासी सेवेत वावरत असलेल्या अशा अनधिकृत ऑटोरिक्षाचे फारच पेव फुटलेलेआहेत. त्याचा दुष्परिणाम बँकेमार्फत कर्जे घेऊन रिक्षा घेतलेल्या परवानाधारकांच्या व्यवसायावर होत आहे.

सदर निवेदनाव्दारे अशी मागणी करीत आहेत की, अशा अनधिकृत ऑटोरिक्षांना सीएनजी इंधन मिळू नये हयाकरीता सीएनजी पुरवठा केंद्रावर आर.एफ.आय.डी. पध्दत सुरु करण्यात यावी. त्याचप्रमाणे प्रादेशिक परिवहन कार्यालयात मोडित काढण्यास आलेली वाहने पुर्नवापरात येऊ नये म्हणून हॅड्रॉलिक हॅमर किंवा जेसीबी मशिन ने दाबून टाकावीत.

सदर विषयाबाबत बैठकीत चर्चा करण्यात आली.

निर्णय:

१) ऑटोरिक्षा/टॅक्सी स्क्रॅप करण्याकरिता हायड्रोलिक प्रेस इत्यादीसारख्या संयंत्रांचा वापर करण्यासाठी प्राधिकरणाने मंजूरी दिली व याकरिता परिवहन कार्यालयाने कार्यपध्दती निश्चित करुन मान्यतेसाठी सादर करावी, असे निर्देश प्राधिकरणाने दिले.

२) आरएफआयडी प्रणाली ऑटोरिक्षा/टॅक्सी संवर्गातील वाहनांसाठी चालू करण्यास मंजूरी देण्यात आली व याकरिता परिवहन कार्यालयाने कार्यपध्दती निश्चित करुन मान्यतेसाठी सादर करावी, असे निर्देश प्राधिकरणाने दिले.

(निर्णय क्रमांक २८/२०१५)